गीतयात्रा


★ फिर सुबह होगीद्वारा संगीतकार खय्याम व खय्याम यांच्या संगीताने गाजलेला *लाल*

फिर सुबह होगी(१९५८):


नरगिसची साथ सोडल्यानंतर राज कपूरने माला सिन्हाबरोबर नायकाची भूमिका केलेला *परवरिश*नंतरचा १९५८चा आणखी एक चित्रपट म्हणजे रमेश सायगल यांचा *फिर सुबह होगी*. नरगिस तेव्हा सुनील दत्तबरोबर वैवाहिक जीवनात स्थिरावली होती. तरीही राज कपूरबरोबरच्या तिच्या प्रेमसंबंधाची चर्चा काही तेव्हा संपलेली नव्हती. फिल्मी वृत्तपत्रातून या चर्चेचे पडसाद उमटत होते आणि त्याचबरोबर राज कपूरची भूमिका असलेल्या चित्रपटांच्या गाण्यातून देखील.

*फिर सुबह होगी*मध्ये मुकेश व रफी यांनी गायलेले एक गाणे होते. 'अरे फिरते थे जो बडेही सिकंदर बने हुए', 'जिस प्यार में तोबा'. या गाण्यात नरगिसचे नाव मुद्दाम गोवण्यात आले होते. 'इन नरगिस की आँखों के छुमे' अशी एक ओळ या गाण्यात मुद्दाम टाकून ही ओळ पडद्यावर राज कपूरच्या तोंडी टाकण्यात यावी अशी रमेश सायगल यांची इच्छा होती. पण राज कपूरना ही गोष्ट प्रशस्त वाटली नाही. यामुळे या गाण्यातील नरगिसचे नाव तो आपल्या तोंडी घ्यायला तयार झाला नाही. तरीही रमेश सायगलनी नरगिसचे नाव या गाण्यातून काढून टाकले नाही. राज कपूरचा आवाज असलेल्या मुकेशबरोबरच रफीचा आवाजदेखील या गाण्यात होता. नरगिसचा उल्लेख असलेला या गाण्यातील भाग त्यांनी रफीला गायला लावला आणि राज कपूरबरोबर पडद्यावर हे गाणे गाणाऱ्या रहेमानच्या तोंडी नरगिसचा नामोल्लेख त्यांनी टाकला.

खय्याम या चित्रपटाचे संगीतकार होते. १९४८ चा *हीररांझा* हा खय्यामनी संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. हा चित्रपट त्यांनी रहेमान वर्मा यांच्याबरोबर आपली जोडी जमवून वर्माजी शर्माजी या नावाने केला होता. त्यांच्याबरोबर अझीज हिंदी देखील या चित्रपटाचे संगीतकार होते. १९५० चा *बीवी*हा चित्रपट त्यांनी शर्माजी या नावाने संगीतबद्ध केला होता. पण हा चित्रपट देखील पूर्णपणे त्यांचा एकट्याचा चित्रपट नव्हता. त्यांच्याबरोबर अझीझ हिंदीनी या चित्रपटाची काही गाणी संगीतबद्ध केली होती. १९५१च्या नरगिसच्या *प्यार की बाते* या चित्रपटाची काही गाणी त्यांनी शर्माजी नावाने संगीतबद्ध केली होती. त्यांच्याबरोबर भोला श्री श्रेष्ठ व बुलोसी रानी यांनी देखील या चित्रपटाची काही गाणी संगीतबद्ध केली होती. १९५३चा *फुटपाथ* खय्यामनी खऱ्या अर्थाने एकट्याने व खय्याम या नावाने संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात दिलीपकुमार सारखा नायक त्यांच्या वाट्याला आला होता आणि त्याच्यासाठी तलतने गायलेले या चित्रपटातील 'शामे गम की कसम' हे गाणे चांगलेच लोकप्रिय ठरले होते. ही लोकप्रियता त्यानंतर त्यांच्या *धोबी डॉक्टर, गुलबहार, तातार का चोर* या चित्रपटातील संगीताला मात्र लाभली नव्हती. यामुळे *फिर सुबह होगी*च्या वेळी एखाद्या नव्या संगीतकाराप्रमाणे त्यांना परीक्षा द्यावी लागली होती. या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी त्यांच्यावर सोपवताना रमेश सायगलनी त्यांना स्पष्ट



खय्याम



तलत



आशा

सांगितले होते, "राज कपूर माझ्या चित्रपटाचा नायक आहे. तुमच्या चाली तुम्हाला आधी त्याला ऐकवाव्या लागतील आणि त्या त्याने पसंत केल्या तरच माझ्या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी तुमच्याकडे राहील."

खय्याम यांच्या हाती तेव्हा एकही चित्रपट नव्हता. यामुळे रमेश सायगल यांची ही अट स्वीकारून *फिर सुबह होगी*च्या गाण्याच्या चाली त्यांना आधी राज कपूरला ऐकवाव्या लागल्या होत्या आणि त्या त्याने ओ. के. केल्यावरच हा चित्रपट त्यांच्या पदरी पडला होता. *फुटपाथ*नंतर खय्याम यांच्या संगीताला लोकप्रियता मिळवून देणारा हा दुसरा चित्रपट. *आवारा*त मुकेशने गायलेल्या 'आवारा हूं' या गाण्यापासून शंकर-जयकिशननी मुकेशच्या गाण्याचा एक राज कपूरी तोंडावळा तयार केला होता. *फिर सुबह होगी*मधील 'आसमां पे खुदा है और जमीं पे हम' या मुकेशच्या गाण्यात खय्यामनी ही राज कपूरी शैली अचूक पकडली होती. राज कपूर नायक असल्यामुळे खय्यामनी या चित्रपटात मुकेशचा आवाज अगदी भरभरून वापरला. मुकेशच्या आवाजातील त्यांचा हा पहिलाच चित्रपट. 'आसमा पे है खुदा'बरोबरच या चित्रपटातील 'वो सुबह कभी तो आयेगी', 'चीनो अरब हमारा हिंदोस्ता हमारा' ही आणखी दोन गाणी मुकेशने गायली. या गाण्यांपैकी 'वो सुबह कभी तो आयेगी' हे गाणे या चित्रपटात दोन भागात होते. 'फिर न कीजे मेरी गुस्ताख निगाहो का मिला' हे या चित्रपटातील आणखी एक गाणे मुकेश व आशाबाई यांनी गायले होते. तर 'दो बुंदे सावन की हाय दो बुंदे सावन की' हे गाणे आशाबाईंनी एकटीने गायले होते. 'अरे फिरते थे जो बडेही सिकंदर बने हुए' हे गाणे मुकेशबरोबर गात असताना रफीने ब चित्रपटातील 'सबकी हो खैर बाबा, सबका भला' हे गाणे कोरसबरोबर गायले होते.

*फिर सुबह होगी*चे गीतकार होते साहिर. त्यांच्याबरोबरचा खय्याम यांचा हा पहिला चित्रपट. या चित्रपटाच्या संगीतामुळे ते साहीर यांचे ए आवडते संगीतकार बनले होते. *फुटपाथ*प्रमाणेच खय्याम यांचा हा चित्रपट फारसा चालला नव्हता. पण या चित्रपटातील खय्याम यांचे संगीत मात्र चांगलेच चालले होते.

लाल रूख(१९५८):

*फिर सुबह होगी*बरोबरच खय्यामनी संगीतबद्ध केलेला १९५८ चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *लाल रूख*. तलत महमूद या चित्रपटाचा नायक होता. १९५३च्या कारदार यांच्या *दिले नादान* या चित्रपटापासून आपल्या चित्रपटातील तलतच्या नायकाची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरू झाली. जोवर तो फक्त पार्श्वगायक होता तोवर त्याची गाणी असलेल्या चित्रपटात त्याच्याबरोबर रफीचा आवाज असायचा. तेव्हा 'हो हैय्या ऽ ऽ

गीतकार साहिर यांचे लाडके बनले. ★ तलत, आशा यांच्या गायकीने रूख. ★ रागिनीत किशोरकुमारचे 'मन मोरा बावरा' रफीच्या आवाजात.

☐ इसाक मुजावर

नदिया में उठा शोर, छाई है घटा घनघोर' (*बाबुल* १९५०, शमशादबरोबर), 'भर दे झोली अल्लाह नाम (*लैला मजनू* १९५३), ही गाणी त्या दोघांनी मिळून गायलीदेखील होती. पण १९५३च्याच *दिले नादान* या चित्रपटापासून नायक म्हणून तलतची जी वाटचाल येथे सुरू झाली त्या वाटचालीत १९५७पर्यंत तलतची नायकाची भूमिका असलेल्या चित्रपटात रफीचा आवाज कधीही ऐकू आला नव्हता. १९५८च्या *लाल रूख*मध्येच तो सर्वात प्रथम ऐकू आला. तलत या चित्रपटाचा नायक असल्यामुळे त्यांच्या वाट्याला या चित्रपटात तीन गाणी आली होती. या तीन गाण्यांपैकी 'उदास उदास फिजाओ में आनाही पडेगा' व 'मुहब्बत



किशोर-रफी एकत्र

बनाए मुहब्बत मिटाए, थी एक शाहजादी' ही दोन गाणी त्याने एकट्याने गायली होती व 'प्यास कुछ और भी भडका दी झलक दिखला के' हे गाणे आशाबाईंच्याबरोबर. या साऱ्या गाण्यात तलतच्या गाण्यांचा गोडवा होता. यामुळे ही गाणी चांगलीच लोकप्रिय ठरली होती. हीच लोकप्रियता या चित्रपटातील रफीच्या एका गाण्याला देखील मिळाली होती, या गाण्याचे बोल होते 'हे कली कली के लबपर तेरे हुस्न का फसाना'.

तलतबरोबर एक गाणे गात असताना आशाबाईंनी या चित्रपटातील 'ले जा मेरी दुवाए दामन छुडानेवाले, अलविदा जाने वफा तेरा निगाहबवान खुदा' व 'प्यास कुछ और भी भडका दी झलक दिखला के' ही तीन गाणी एकटीने गायली होती. या गाण्यांपैकी 'प्यास कुछ और भी भडका दे' हे गाणे या चित्रपटात दोन भागात होते. या गाण्याचा एक भाग एकटीने गात असताना दुसरा भाग आशाबाईंनी तलतबरोबर गायला होता. ओ. पी. नय्यरच्या संगीताचा रंग तेव्हा आशाबाईंच्या आवाजावर हळूहळू चढू लागला होता. तरीही खय्यामनी या चित्रपटातील आशाबाईंच्या गाण्याचा अंदाज गझलाना ठेवला होता. यामुळे *उमराव जान*मधील गाण्यांचा गोडवाच या चित्रपटातील आशाबाईंच्या गाण्यात निर्माण झाला होता. कैफी आझमींनी या चित्रपटाची एकजात सारी गाणी लिहिली होती. हा चित्रपट चालला नव्हता. तरीही या चित्रपटातील खय्याम यांचे संगीत मात्र चांगलेच चालले होते. यामुळे संगीतासाठीच हा चित्रपट आजही आठवतो.

रागिनी(१९५८):

ओ.पी. नय्यर १९५८चे जास्तीत जास्त चित्रपट संगीतबद्ध करणारे संगीतकार. एकूण नऊ चित्रपट १९५८ साली त्यांनी संगीतबद्ध केले. या नऊ चित्रपटातला एक चित्रपट म्हणजे *सोने की चिडियां*. बाकीचे आठ चित्रपट म्हणजे *फरिस्ता, हावडा ब्रिज, कभी अंधेरा कधी उजाला, मिस्टर कार्टून एम. ए., मुजरीम, फागुन, रागिनी, बारह बजे*.

या चित्रपटापैकी *रागिनी* अशोककुमारने त्याच्या अशोककुमार पिक्चर्सतर्फे निर्माण केला होता. यातील 'मन मोरा बावरा' हे गाणे शास्त्रीय सुरावटीतील एक गाणे. पडद्यावर किशोरकुमार हाती तानपुरा घेऊन गाताना दिसतो. तोवरच्या किशोरकुमारच्या गायकीचा विचार करायचा झाला तर 'बम चिकी बम' छापाची उडती गाणी गाणारा गायक हीच त्याच्या गाण्याची प्रतिमा होती. या प्रतिमेत 'मन मोरा बावरा' हे गाणे कोठेच बसण्यासारखे नव्हते. यामुळे अनेकांचा या गाण्याविषयी असा समज आहे की, किशोरकुमारच्या गळ्याला हे गाणे झेपण्यासारखे नसल्यामुळे हे एकच गाणे या चित्रपटात त्याला मुद्दाम रफीच्या आवाजात गायला लावण्यात आले. पण हे खरे नाही. *रागिनी*च्या निर्मितीची तयारी चालली होती तेव्हा या चित्रपटातील नायकाच्या भूमिकेसाठी भारत भूषणच्या नावाचा अग्रक्रमाने विचार करण्यात आला होता आणि तोच या चित्रपटात नायकाची भूमिका करणार आहे हे गृहित धरून 'मन मोरा बावरा' हे गाणे तेव्हा रफीच्या आवाजात ध्वनिमुद्रित करण्यात आले होते. *बैजू बावरा*पासून रफी भारत भूषणची जी गाणी गात होता त्या गाण्याच्या चौकटीत चपखलपणे बसेल, असेच हे एक गाणे होते. पण पुढे भारत भूषणऐवजी किशोरकुमार या चित्रपटाचा नायक झाला. म्हणून काही त्याच्यासाठी रफीच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आलेले या चित्रपटातील गाणे किशोरकुमारच्या आवाजात नव्याने रेकॉर्ड करण्यात आले नाही. ते रफीच्या आवाजातच या चित्रपटात कायम ठेवण्यात आले. यामुळे या चित्रपटातील 'मन मोरा बावरा' या एका गाण्यात किशोरकुमारला रफीच्या आवाजात गावे लागले. हे गाणे भारत भूषणच्या गाण्याचा रंग असलेले एक अभिजात गाणे होते. त्याच्याऐवजी किशोरकुमार या चित्रपटाचा नायक बनताच या चित्रपटातील अन्य गाण्यात हा रंग बदलला आणि किशोरकुमारच्या गाण्यातील अवखळपणा या चित्रपटातील 'पिया मैं हूं तू डोर', 'मैं बंगाली छोकरा करू प्यार को नमस्कार', 'मुझको बार बार याद न आ' व 'मुड मुड हमको देखना, छुप छुप नजरे फेकना' या गाण्यातून आला. ही सारी गाणी किशोरकुमारने या चित्रपटात आशाबाईंच्याबरोबर गायली होती. रफीच्या आवाजात त्याने गायलेले 'मन मोरा बावरा' हे गाणे या या चित्रपटातील गायकाच एक सोलो गाणे होते. किशोरकुमारच्या वाट्याला मात्र या चित्रपटात एकही सोलो गाणे आले नव्हते. या चित्रपटातील त्याची गाणी आशाबाईंच्याबरोबरची द्वंद्वगीते होती.

'छोटासा बालमा, अंखियन नींद चुराए ले' हे शास्त्रीय सुरावटीतील गाणे नय्यरनी आशाबाईंच्या आवाजात फुलवले होते. 'दिल तोडनेवाले बता के जा', 'मैने रात गुजारी तारे गिन गिन के सैया', 'कुछ ऐसा छेड उमंगों का राग', 'छेड दिए दिल के तारे क्यों' ही या चित्रपटातील गाणी देखील आशाबाईंच्या आवाजातच होती आणि ओ. पी. नय्यर यांच्या संगीताचा सूर या साऱ्या गाण्यांत चांगलाच लागला होता.

विनोद मेहरा पन्नासच्या दशकात आपल्या चित्रपटातील एक बालकलाकार होता आणि *रागिनी*त तो छोट्या किशोरकुमारच्या भूमिकेत चमकला होता. जब्बीन या चित्रपटाची एक नायिका होती. तिच्या बालपणची भूमिका या चित्रपटात बेबी मीनाक्षीने केली होती. ती व विनोद मेहरा या दोघांच्यावर या चित्रपटातील 'मैं जादूगर मतवाला हूं, इस दुनिया से निराला हूं' हे गीता दत्त व आशा भोसले यांनी गायलेले गाणे चित्रीत करण्यात आले होते. हे गाणे व या चित्रपटातील 'पिया मैं हूं पतंग तू डोर', 'दिल तोडनेवाले बता के जा', 'मन मोरा बावरा', 'छो दिए दिल के तार क्यों', 'मैने रात गुजारी', 'मुंड मुड हमको देखना' ही आणखी सहा गाणी जाँ निसार अख्तरनी लिहिली होती. बाकीची गाणी कमर जलालाबादींनी. ●